तेजस्वी अर्थमुव्हर्स हन्नुर
विविध कामासाठी जेसीबी भाड्याने मिळेल.
* अनुभवी
जेसीबी ऑपरेटर
पाहिजे.



संपर्क : प्रो.प्रा गौतम बाळशंकर
९०२११२६५२३८/७५५८७६१०७९

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १६२ वा ● बुधवार ०१ नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 162 | Date : 01/11/2023 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

## महाराष्ट्रावर मोठं संकट, ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर; केंद्र सरकारला मदतीसाठी आवाहन



मुंबई : महाराष्ट्रातील ३६ पैकी १३ जिल्ह्यांत दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली आहे. १३ जिल्ह्यांत एक जून ते सप्टेंबर या काळात पडणाऱ्या सरासरी पावसात २० टक्क्यांहून जास्त तूट आली आहे. नगर, सांगली, सातारा, जालना, बीडमध्ये पडणाऱ्या पावसात ४० टक्क्यांहून जास्त तूट निर्माण झाल्यामुळे या जिल्ह्यांमधील रहिवाशांना आणि शेतकऱ्यांना पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे राज्यात दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी सातत्याने केली जात होती. त्यानुसार आता महाराष्ट्र सरकारने राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारने म्हटलं आहे की, राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीतल्या पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, पेरणीखालील क्षेत्र आणि पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यांमध्ये आपत्तीची शक्यता विचारात घेवून राज्य सरकार १५ जिल्ह्यांमधील २४ तालुक्यांमध्ये गंभीर आणि १६ तालुक्यांमध्ये मध्यम स्वरुपाचा दुष्कार जाहीर करत आहे.

दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांमध्ये काही सवलती लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार जमीन महसूलात सूट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या चालू वीजबिलात । **पान २ वर**

## न्या.शिंदे समितीचा पहिला अहवाल स्वीकारला
### कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु

मुंबई : मराठवाड्यातील निझामकालीन व इतर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे मराठा - कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रांसंदर्भात कार्यवाही निश्रि्चत करणाऱ्या निवृत्त न्या. संदीप शिंदे समितीचा पहिला अहवाल आज राज्य मंत्रिमंडळाने स्वीकृत केला. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या अहवालामध्ये निवृत्त न्या. संदीप शिंदे समितीने नमूद केल्याप्रमाणे मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील सुमारे पावणेदोन कोटी नोंदी तपासण्यात आल्या असून १३ हजार ४९८ जुन्या कुणबी नोंदी आढळल्या आहेत. या कुणबी नोंदी तपासण्याचे काम दररोज सुरु असून अशा नोंदी असलेल्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्यास देखील आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या नोंदी तपासताना मोडी आणि उर्दू भाषेतील दस्तावेज आढळून आला. या कागदपत्रांचे भाषांतर करून जतन करण्यासाठी ते डिजिटाईज करून पब्लिक डोमेनवर आणून त्या आधारे कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यास देखील आज मान्यता देण्यात आली.

न्या. शिंदे यांच्या अहवालातील शिफारशींनुसार मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल. याशिवाय मराठा समाजाचे सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी तसेच उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय



आणि इतर न्यायालयीन प्रकणात मराठा समाजाचे आरक्षण टिकून कसे राहील यासाठी शासनाला मार्गदर्शन करण्याकरिता न्या. दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली न्या. मारोती गायकवाड, न्या संदीप शिंदे यांचे सल्लागार मंडळ नियुक्त करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मागासवर्ग आयोगला नव्याने इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे निर्देश देण्यास देखील आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

## थेट कारवाई करा; हिंसक आंदोलनानंतर पोलिसांना सूचना

छत्रपती संभाजीनगर : मागील काही दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी शांततेत सुरू असलेल्या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात तोडफोड आणि जाळपोळीच्या घटना समोर येत आहे. यात अनेक राजकीय नेत्यांची घरं आणि कार्यालय पेटवून देण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या सर्व पार्श्र्वभूमीवर आता पोलिसांना वरिष्ठ पातळीवरून विशेष सूचना देण्यात आल्या आहे. यापुढे होणाऱ्या हिसंक आंदोलनात बघ्याची भूमिका घेऊ नका, तोडफोड आणि नुकसान होत असल्यास थेट कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहे. त्यामुळे पोलीस आता अलर्ट मोडवर आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात हिंसक वळण लागलं. राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळुंके, संदीप क्षीरसागर यांची घरं पेटवून देण्यात आली. सोबतच राष्ट्रवादीचे कार्यालय देखील पेटवण्यात आले. बीड शहरातील बस स्थानकात आंदोलकांनी तब्बल ७२ बस फोडल्या. तिकडे हिंगोली जिल्ह्यात देखील भाजपचा कार्यालय पेटवून देण्याचा । **पान २ वर**

## कंत्राटी भरतीचा शासन निर्णय अखेर रद्द, नेमलेल्या ९ कंपन्याच कंत्राट मागे घेण्याचे आदेश

मुंबई : कंत्राटी भरतीचा शासन निर्णय रद्द मागे घेण्यात आला असू नेमलेल्या ९ कंपन्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. आज जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयात नेमलेल्या ९ कंपन्यांचे कंत्राट रद्द करण्यात येणार आहेत. तर येत्या नऊ महिन्यांमध्ये कंत्राटी पदांच्या सेवा संपुष्टात आणण्याचे आदेश देण्यात आलेत. सरकारवर टिका झाल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्रकार परिषद घेत हा निर्णय मागे घेण्याची घोषणा केली होती.

राज्य शासनाने घेतलेल्या कंत्राटी भरतीचा निर्णय अत्यंत वादग्रस्त ठरला. राज्यात अनेक ठिकाणी यावरुन निदर्शने देखील करण्यात आली. पण हा मुद्दा पेटल्यानंतर राज्य सरकारने हा निर्णय मागे घेण्याची घोषणा केली. शिंदे फडणवीस सरकारकडून सुरू असलेल्या



कंत्राटी भरतीविरोधात विरोधकांनी रान उठवले . आज देवेंद्र फडणवीसांनी पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिले. . कंत्राटी भरतीवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांवर निशाणा साधला. दरम्यान कंत्राटी भरतीचा पहिला जीआर हा काँग्रेस सरकारने काढला होता, असा आरोप देवेंद्र फडणवीसांनी केला. कंत्राटीकरणाचे पाप काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि आता त्याविरोधात आंदोलन करत असल्याचं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं. कंत्राटी भरती काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे पाप आहे. त्यांच्या पापाचे ओझे आमच्या सरकारने का उचलावे? असा सवाल करत कंत्राटी भर्ती रद्द केल्याची घोषणा देवेंद्र फडणवीसांनी केली.

कंत्राटी भरती संदर्भात पहिला जीआर १३ मार्च २००३ रोजी काढण्यात । **पान २ वर**

## मोदी सरकारकडून विरोधकांचे फोन हॅक करण्याचा प्रयत्न
### केंद्रीय मंत्री आणि Apple कंपनी स्पष्टीकरण देत म्हणाले

नवी दिल्ली : मोदी सरकार इंडिया आघाडीतील काही प्रमुख नेत्यांचे फोन हॅक करून हेरगिरी करण्याच्या प्रयत्नात असल्याचा इशारा देणारे संदेश ॲपल कंपनीकडून या नेत्यांना पाठवण्यात आल्याचं तथाकथित प्रकरण आज (३१ ऑक्टोबर) सकाळी समोर आलं. कदाचित शासनपुरस्कृत हल्लेखोर तुमचे आयफोन हॅक करण्याच्या प्रयत्नात आहेत. तुम्ही जे कुणी आहात किंवा तुम्ही जे काही करत आहात, त्यामुळे हे हल्लेखोर तुमचे फोन हॅक करण्याची शक्यता आहे, असे संदेश या नेत्यांना पाठवण्यात आले आहेत.

तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, काँग्रेस खासदार शशी थरूर, ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, आप खासदार राघव चड्ढा यांच्यासह अनेक नेत्यांनी यासंदर्भात तक्रार केली असून एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर यासंदर्भातले स्क्रीनशॉट शेअर केले आहेत. दरम्यान, विरोधी पक्षांच्या फोन हॅकिंगच्या आरोपांवर केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी उत्तर दिलं आहे. वैष्णव म्हणाले, केंद्र सरकार या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत आहे. अनेक खासदारांनी केलेल्या तक्रारींमुळे आम्ही चिंतेत आहोत.

दुसऱ्या बाजूला याप्रकरणी ॲपल कंपनीनेही स्पष्टीकरण दिलं आहे. कंपनीने म्हटलं । **पान २ वर**

## अक्कलकोट येथे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी सोमवारपासून साखळी उपोषणास सुरुवात

अक्कलकोट/प्रतिनिधी: 'एकच मिशन मराठा आरक्षण!' मराठा समाजाच्या आरक्षण लढ्याकरिता अक्कलकोट तालुका व शहरातील समाज बांधवांनी एकत्रित येवून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढत असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी सोमवारपासून साखळी उपोषणास सुरुवात करण्यात आले.

दरम्यान सकल मराठा समाजाच्यावतीने संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी आयोजित साखळी उपोषणास शिवछत्रपती शिवजी महाराज यांच्या पुतळ्याच्या पुजनाने साखळी उपोषणास सुरूवात करण्यात आली. याप्रसंगी सकल मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते सुरेशचंद्र सुर्यवंशी, ॲड. शरदराव फुटाणे-जाधव, शिवाजीराव पाटील, महेश इंगळे, अमोलराजे भोसले, स्वामीराव मोरे काका, सोपानराव गोंडाळ, श्रीमती ताराबाई हांडे, माया जाधव, मिरा ब्रद्रुक, बाळासाहेब मोरे, सुधाकर गोंडाळ, बापूजी निंबाळकर, अरुण



साळुंके, सुभाष गडसिंग, स्वामीराव सुरवसे, तम्मा शेळके, संजय मोरे, स्वामीराव मोरे, बापूजी निंबाळकर प्रदिप तोरसकर, प्रदिप जगताप, बाबासाहेब पाटील, यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

या साखळी उपोषणास माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अप्पापासाहेब पाटील, शिवसेना तालुका प्रमुख संजय देशमुख, शिवा संघटनेचे प्रा. परमेश्र्वर आरबाळे, माजी नगरसेवक महेश हिंडोळे, प्रा. किशनराव झिपरे, शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुखा आनंद बुक्कानुरे, राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनिल बंडगर, रिपाइंचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे , रीपाई शहर अध्यक्ष अजय मुकणार, रासपचे माजी तालुकाध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रासपचे अक्कलकोट तालुका युवक आघाडीचे । **पान २ वर**

दैनिक
यश सिद्धी न्यूज
संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे मो.9921988358

सुवर्णसंधी

लेखक/कवि/साहित्यक/विचावंत यांना सुवर्णसंधी
दैनिक यशसिध्दी न्यूज या वृत्तपत्राच्या
दिवाळी विशेषांकामध्ये
आपले लेख/कविता/इतर साहित्य प्रकाशनासाठी
संपर्क मो.९९२१९८८३५८ साधावा.

: संपादक :
कमलाकर सोनकांबळे

www.yashsiddhinews.com
Epepar-yashsiddhinews.com
टिप : दिवाळी अंक हा पुस्तक स्वरुपात असेल...

## मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी वागदरी येथे एक दिवशी लाक्षणिक उपोषण

अक्कलकोट/प्रतिनिधी : मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी वागदरी भागातील सकल मराठा समाज वागदरी व सर्व राजकीय पक्ष व विविध सामाजिक संघटनेच्या वतीने व युवकाच्या माध्यमातून मराठा समाजाचे नेते भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, यांच्या नेतृत्वाखाली एक दिवशी लाक्षणिक उपोषण करण्यात आले यावेळी शेळके प्रशालेचे चेअरमन बसवराज शेळके, जेष्ठ नेते श्रीशैल ठोंबरे, युवक काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष शिवराज ( मंत्री ) पोमाजी, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, शिवसेना ( उबाठा ) विभागप्रमुख मुगेद्र मुदिनकेरी, वागदरीचे तंटामुक्त अध्यक्ष शरणप्पा मंगाणे, शिवाजी सावंत, महादेव सोनकवडे, सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच तालुकाध्यक्ष श्याम बाबर, संतोष पोमाजी, सुनील सावंत, घालया मठपती, मनसेचे राज यादव, प्रकाश पोमाजी, मकबूल कणमुसे, राम मोरे ,विशाल सावंत , सौरभ उंबरे, समर्थ सावंत, गणेश सावंत, चंद्रकांत कणसे,दिगंबर कणसे, लक्ष्मण पवार,



चंद्रकांत मातोळे, तानाजी इंगळे, राहुल शिंदे, काशिनाथ पोमाजी, राम सगट, परमेश्र्वर खासगी पिंटू पोमाजी, सागर पोमाजी यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते,

यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी या ठिकाणी आपण सर्वांनी शांततेत आंदोलन करायचे आहे । **पान २ वर**



अक्कलकोटचे रॉयल नगरसेवक मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसा निमित्त दैनिक यश सिध्दी न्युज या वृत्तपत्राचे विशेष अंक प्रकाशन जननायक मिलन दादा कल्याणशेट्टी, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अपू परमशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच युवा नेते सागर दादा कल्याणशेट्टी, संपादक कमलाकर सोनकांबळे, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, शेळके प्रशालेचे चेअरमन बसवराज शेळके, जेष्ठ नेते श्रीशैल ठोंबरे, किरनळी सरपंच सतीश कणमुसे, सिद्धार्थ सोशल फाउंडेशन सचिव निजप्पा गायकवाड भाजप युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष धोडुराज बनसोडे, नागेश कलशेट्टी, सैराट चे सरपंच सिद्धाराम मठपती, डॉ रवींद्र बनसोडे, वागदरीचे तंटामुक्त अध्यक्ष शरणाप्पा मंगाणे, सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच तालुकाध्यक्ष श्याम बाबर, संतोष पोमाजी, सुनील सावंत, घालया मठपती, प्रकाश पोमाजी, परमेश्र्वर गायकवाड, इरण्णा हुलगणे, मकबूल कणमुसे,आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

बुधवार दि.०१ नोव्हेंबर २०२३



## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
– स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### गरिबीची चेष्टा..

भारताच्या अब्रूची लक्तरे जगाच्या वेशीवर टांगली गेली आहेत. यंदाची ही यादी १२५ देशांची आहे आणि त्यात भारताचे स्थान अगदी तळाला म्हणजे १११ क्रमांकावर असल्याचे निर्देशित करण्यात आले आहे. या आधीच्या यादीत भारत १०७ व्या स्थानावर होता. कोणत्याही संवेदनशील सरकारसाठी हा चिंतेचा विषय असला पाहिजे. पण आपल्या भारत सरकारमधील कॅबिनेट मंत्री स्मृती इराणी यांनी मात्र या निर्देशांकाची जी चेष्टा केली आहे ती सध्या मोठाच वादाचा विषय ठरला आहे. नाष्टा न करता तुम्ही विमान गाठण्यासाठी लगबगीने जेव्हा एअरपोर्टवर जाता त्यावेळी तुम्हाला कोणाचा तरी फोन येतो आणि तो विचारतो की तुम्ही भुकेलेले आहात काय, तर तुम्ही निश्चितच उत्तर देता की होय मी भुकेलेला आहे. अशा पध्दतीने तीन हजार जणांना फोन करून हा भूक निर्देशांक मोजला जातो. त्यामुळे त्या निर्देशांकाला काही एक महत्त्व नाही, अशी चेष्टा स्मृती यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केली आहे. त्यावरून सोशल मीडियावरून स्मृती चांगल्याच ट्रोल झाल्या आहेत. वाढत्या महागाईमुळे मोदी सरकारवर नागरिक नाराज आहेत. दरम्यान, हा भूक निर्देशांक कशाच्या आधारे मोजला जातो त्याचे निकष जगजाहीर आहेत. चार महत्त्वाच्या निकषांवर हा भूक निर्देशांक मोजला जातो. बालकांमधील कुपोषण, त्यांच्या उंचीच्या मानाने मुलाचे वजन अशा स्वरूपाच्या अत्यंत बारकाईच्या निकषांच्या आधारावर हा निर्देशांक मोजला जातो. स्मृती या महिला व बालकल्याणमंत्री आहेत. निदान त्यांना तरी हा विषय माहिती असायला हवा होता. नव्याने जाहीर झालेल्या जागतिक भूक निर्देशांकाची ही यादी आयएफपीआरआय म्हणजेच इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूटने जाहीर केली आहे. ही संस्था १९७५ साली स्थापन झाली असून या संस्थेत पाचशेहून अधिक कर्मचारी आणि विविध विषयातील संशोधक तेथे कार्यरत आहेत. या यादीच्या अनुषंगाने या संस्थेने जी निरीक्षणे नोंदवली आहेत ती भारतासाठी अधिक चिंताजनक आहेत. यात म्हटले आहे की भारत कुपोषित बालकांच्या संख्येच्या दृष्टीने जगातला पहिल्या क्रमांकाचा देश बनला आहे. भारतातील असंख्य बालकांचे शरीर त्यांचे वय आणि त्यांच्या उंचीच्या मानाने खूपच दुबळे आहे. म्हणजे एकूणच भारतातील भुकेची ही समस्या अत्यंत भीषण पातळीवर गेल्याचे दिसत असताना देशाच्या महिला आणि बालकल्याण मंत्र्याने हा विषय असा टिंगलीवारी नेणे ही देशातील गरिबांचीच क्रूर चेष्टा आहे.

पान १ वरुन

### महाराष्ट्रावर मोठं संकट,

३३.५ टक्के सूट, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचं परिक्षा शुल्क माफ करणे, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तिथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे अशा काही सवलती या दुष्काळग्रस्त तालुक्यांना मिळतील. राज्य सरकारच्या या आदेशान्वये देण्यात येणाऱ्या विविध सवलती पोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा आणि त्यासाठी वित्त विभागाने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागास सादर करण्यात यावा, असे आदेशही राज्य सरकारने दिले आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे केंद्र सरकारनेही राज्याला मदत जाहीर करावी, अशी विनंती केली जाणार असल्याचं राज्य सरकारने म्हटलं आहे.

### थेट कारवाई करा; हिंसक

प्रयत्न करण्यात आला. एकंदरीत या सर्व परिस्थितीनंतर मराठवाड्यात तणावाचे वातावरण पाहायला मिळत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत आता पोलिसांनी बघ्याची भूमिका न घेता थेट कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पातळीवरून देण्यात आले आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर शहरातील आणि जिल्ह्यातील पोलीस देखील अलर्ट झाले आहे.

### कंत्राटी भरतीचा शासन निर्णय अखेर

आला. त्यावेळीच्या काँग्रेस आणि त शरद पवारांच्या सराकरमध्ये कंत्राटी भरती झाली. २०१० साली अशोक चव्हाणांनी पहिला जीआर काढला. सहा हजार कंत्राटी पदाचा जीआर काढण्यात आला. काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या काळात कंत्राटी शिक्षण भर्तीचा जीआर काढण्यात आला.

२०१४ साली पुन्हा पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना देखील कंत्राटी भर्तीचा जीआर काढण्यात आला एमसीए, डाटा एन्ट्री ऑपरेटर अशा विविध पोस्ट साठी हा कंत्राटी पद्धतीने भरण्याचा जीआर काढण्यात आला. १ सप्टेंबर २०२१ ला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते त्यावेळी कंत्राटी भर्तीचा जीआर काढण्यात आला, १५ वर्षाकरता कंत्राटी भर्तीसाठी एजन्सी तयार करण्यात आलं . कंत्राटी भरतीची सुरवात काँग्रेसने केली आणि आता त्याविरोधात आंदोलन करत आहे. त्यांच्या पापाचे ओझे आमचे सरकार उचलणार नाही म्हणून कंत्राटी भरती रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं होतं.

# ओबिसी आरक्षणाचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकरच

भारतात अनेक संस्कार दिले जातात. आपण आपले संस्कार जपून संस्कृती चे पालन करावे अशी शिकवण मोठ्यांकडून लहानांना मिळत असते. संस्कार जपण्यासाठी अनेक म्हणीची निर्मिती देखील झालेली आहे. जसे ज्याचे खावे मिठ त्याचे काम करावे निट, पाखातील काटा काढणाऱ्या लोकांचे उपकार कधी विसरू नये. वरील म्हणीचा अर्थ हाच आहे की कोणी आपल्यासाठी थोड जरी काही केले तरीही त्याचा विसर आपल्याला पडू नये. परंतु हे संस्कार आपल्याला भारतीय संविधान, फुले शाहु आंबेडकर यांच्या बाबतीत दिसून येत नाहीत. भारतीय संविधान व फुले शाहु आंबेडकर यांनी माणसावर व देशावर केलेल्या उपकाराची जाणीव खुप कमी लोकांना आहे. स्वतः ला सुशिक्षित समजणारे लोकही संविधान व फुले शाहु आंबेडकर यांना समजून घेऊ शकले नाही याचे उत्तर आहे केवळ आणि केवळ माणसिक गुलामी. माणसिक गुलामी खुप घातक असते म्हणून महात्मा फुले यांनी पुस्तक लिहले गुलामगिरी, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात गुलामांना गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल. थोडक्यात आज सर्वात मोठी समस्या आहे ती गुलामी. हि गुलामी तोडल्या शिवाय माणसाची व देशाची प्रगती होणे शक्यच नाही. वैचारिक व मानसिक स्वातंत्र्यावर प्रबोधन आणि जागृती करणारे लोकच माणसिक गुलामांना आपले शत्रु वाटतात. शिक्षण घेऊन ही जाती धर्माचा आणि अंधविश्र्वासाचा पगडा मजबूत झाला आहे. अंधविश्र्वासावर बोलले तर धार्मिक भावना दुखतात, पाखंड, थोतांड यावर बोलले तर धार्मिक भावना दुखतात पण महापुरुषांच्या विचारांची व कार्यांची यांना थोडी ही जाणीव नाही तेव्हा कोणाच्या ही भावना दुखत नाहीत एवढी माणसिक गुलामी आहे. माणसिक गुलामी असलेले लोक चुकिच्या व फसवेगिरी च्या गोष्टी तात्काळ स्विकारतात परंतु सत्य आणि जागृती च्या गोष्टी बऱ्याच लोकांना पचत नाही कारण ते आजही माणसिक गुलामच आहेत. आज हक्क अधिकार, शिक्षण नोकरी सर्वांनाच पाहिजे परंतु ते निर्माण करणाऱ्या महापुरुषांचे नाव घेण्याचे घाडस होत नाही एवढे लोकांचे मन कमकुवत झाले आहे. काही लोक संविधान, आरक्षण याची मांडणी चुकिच्या पद्धतीने करून स्वतः ची विद्वता दाखवण्याचा प्रयत्न केला जातो परंतु स्वतः ची विद्वता दाखवण्याच्या नादात स्वतः चे अज्ञानच दाखवून मोकळे होतात. बरेच महाशय म्हणतात ओबिसींना आरक्षण संविधानाने अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले नाही तर ओबीसींना आरक्षण १९९२ साली लागु झाले आणि बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण १९५६ ला झाले. म्हणून आरक्षण हे बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेच नाही असा तर्क काही लोक लावून आपले अज्ञान दाखवतात. आरक्षणाचा मुळ विरोधक कोण हेच मुळात कोणाला समजले नाही. आणि जाती चा पडगा असल्याने त्यांना विरोधक कळणार ही नाहीत. कारण आरक्षणाचे विरोधकांनीच यांना गुलाम बनवून ठेवले आहे. संविधान व संविधान समितीचे भाषणे कधीच न वाचलेल्या लोकांनी आरक्षणावर बोलुन दिशाभूल करून वातावरण दुषीत करू नये. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा आरक्षणा बद्दल संविधानामध्ये तरतूद करायची तेव्हा ३४० नुसार ओबीसी, ३४१ नुसार आणि ३४२ नुसार एस टी आरक्षणाची तरतूद करून घेतली. परंतु जेव्हा यावर चर्चा झाली तेव्हा मात्र ओबीसी अर्थात ३४० ला सर्वांनी विरोध केला. कलम क्रमांक ३४१ व ३४२ ला डॉ बाबासाहेब आंबेडकर मान्यता मिळवून घेऊ शकले परंतु मोठ्या प्रमाणात संविधान सभेत ओबीसी चे असलेले प्रतिनिधी च डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ओबीसी नेमके कोण असा प्रश्र्न विचारून ओबिसी चे आरक्षण नाकारून कलम क्रमांक ३४० रद्द करण्याची मागणी केली. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर कलम ३४० वर ठाम होते त्यांचे मत स्पष्ट होते ते म्हणजे एस सी आणि एसी समुदाया प्रमाणेच एक मोठा समुदाय जातीव्यवस्थे नुसार शैक्षणिक व सामाजिक दृष्टीने मागास आहे. त्यांना ही आरक्षणाची गरज आहे. परंतु त्यावेळी ३४० कलमावर सर्वात जास्त चर्चा होऊन मुळ ओबिसी मध्ये येणाऱ्या प्रतिनिधींनी च ओबिसी च्या आरक्षणाचा विरोध केला. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर अनेक प्रकारे अनेक अन्याय अत्याचार झाले होते पण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घेतली. म्हणून ओबीसी प्रवर्गाला ओबिसी च्याच प्रतिनीधी कडून विरोध झाला, कलम रद्द करण्याची मागणी झाली तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ३४० कलम रद्द केले नाही. कलम तसेच ठेवून त्यामध्ये त्यांनी इतर मागास जातीचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रपती तात्काळ समीतीचे गठण करतील व समितीच्या अहलानुसार मागास जातींच्या कल्याणासाठी सरकार उपाय योजना करेल अशी तरतूद करून ओबिसींचा विरोध असताना ही ओबीसींना अस्तीत्व निर्माण करून दिले. म्हणून ते महामानव आहेत. संविधान लागु झाल्याबरोबर तिनच वर्षात अर्थात २९ जानेवारी १९५३ ला कलम क्रमांक ३४० नुसार कालेलकर समीती स्थापण करण्यात आली. आणि या समितीने २३९९ जाती ओबीसी प्रवर्गासाठी शोधुन काढल्या परंतु तत्कालीन सरकारने कालेलकर आयोगावर आक्षेप घेऊन ओबीसी आरक्षण नाकारले. त्यानंतर ओबीसी आरक्षण मुद्दा तसाच रेंगाळत पडला. ओबिसी चे नेते जागृत नसल्याने आणि संविधान बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून जातीवादी माणसिकतेच्या लोकांनी संविधान वाचलेच नाही आजही बहुसंख्य लोकांनी ते वाचले नाही. परंतु समोर कालेलकर आयोगावर पुन्हा चर्चा झाली. कालेलकर आयोगाच्या शिफारशी मान्य नसतील तर नवीन आयोग स्थापन करण्यासाठी १९७९ साल उजाडले. १९७९ साली इतर मागास वर्गीय जातीचा अभ्यास करण्यासाठी मंडल आयोगाची स्थापना करण्यात आली . मंडल आयोगाने अकरा मुद्यावर मागास जातीचा अभ्यास करून ३७४३ जाती ह्या शोधुन काढल्या. अर्थात १९८० च्या दशकात ३७४३ जाती शोधुन त्यांचा ओबीसी मध्ये समावेश केला तेव्हा त्यांची एकुण लोकसंख्येची टक्केवारी ५२% होती. १९३१ नंतर जातवार जनगनणा झाली नाही केवळ मंडल आयोगा नुसार ओबीसीची संख्या १९८० च्या दशकात ५२% असून या आयोगाच्या शिफारशी लागु झाल्या १९९० दशकात. आणि तेव्हा कुठे देशात ओबीसी आरक्षण लागु झाले. महाराष्ट्र पंचायत राज च्या निवडणुका १९९४ ला झाल्या आणि ओबीसींना राजकीय आरक्षणही बहाल करण्यात आले. आता मुळ मुद्दा हा आहे की ओबीसी कलमाला प्रस्थापित लोकांनी विरोध केला तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ते कलम रद्द न करता तसेच ठेवून आयोगाची स्थापना करण्याचा अट्टाहास सोडला नाही. ओबीसी नेत्यांनी व सरकारने ओबीसींना जास्त गांभीर्याने न घेता केवळ त्यांचा वापर करून घेऊन १९५० ते १९९१ पर्यंत ताटकाळत ठेवले. संविधाना मध्ये तरतूद असूनही जवळपास ४० वर्ष लावले. आणि संविधानात जर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तरतूद च केली नसती आज आज ओबीसी यांना कोणतेही हक्क अधिकार मिळाले नसते. परंतु कोणावरही अन्याय न होता सर्वांना समान न्याय देण्याची क्षमता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्येच होती म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांचा खुप छळ झाला तरीही त्यांनी इतरांचा छळ होऊ नये म्हणून काळजी घेतली. परंतु याची जाणीव लोकांना राहली नाही. तरीही सत्य इतिहास कधी लपत नाही. भांडून ओबीसी चे अस्तित्व व हक्क अधिकार आणि आरक्षण संविधानीक चौकटीत बंद करून त्यांचे रक्षण करून खऱ्या अर्थाने ओबिसीच्या आरक्षणाचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकर ठरतात. ओबिसी चे आरक्षण लागु करण्यासाठी सरकारने व ओबिसी नेत्यांनी उशीर केला म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबिसींना आरक्षण दिले नाही असे म्हणणे म्हणजे केवळ स्वतः चे अज्ञान दाखवणे होय. हिंदु महिलांच्या उत्थानासाठी हिंदु कोड बिल पास होत नाही म्हणून मंत्रीपद सोडणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर एकमेव लोकनेता आहेत. परंतु अंगावर महागडी साडी, महागडे घर, पगार, बोलण्याचा, लिहण्याचा, फिरण्याचा, प्रसुती रजेचा, शिक्षणाचा हक्क बहाल करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत याची जाणीव खरचं किती महिलांना आहे? पायातील काटा काढल्याचे उपकार जाना अशी शिकवण देणारे लोक ओबिसीचे व महिलांचे जिवन सुखमय आनंदी व सोन्याचे बनवणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल एकही शब्द बोलत नाहीत तेव्हा यांच्या गुलामीची किव येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार कोणीच फेडू शकत नाहीत. फक्त याची जाणीव असण्यासाठी माणसाकडे प्रामाणिक मन असने आवश्यक आहे.



**– विनोद पंजाबराव सदावर्ते,**
**मोबा: ९१३०९७९३००**

### मोदी सरकारकडून विरोधकांचे

आहे की, असे नोटिफिकेशन अपूर्ण माहितीवर आधारित आहेत. काही अलर्ट खोटेदेखील असतात. तसेच काही सायबर हल्ल्यांचं मूळ शोधणं किंवा ते हल्ले कोणी केले आहेत ते शोधणं अवघड असतं. आम्ही सध्या तरी याबाबत कोणतीही माहिती देण्यास असमर्थ आहोत.ॲपलने म्हटलं आहे की, आमचे गॅजेट्स हे पूर्णपणे सुरक्षित आणि एन्क्रिप्टेड आहेत. युजरच्या परवानगीशिवाय त्यांच्यापर्यंत पोहोचणं किंवा त्यांची कोणतीही माहिती लिक होणं अवघड आहे. प्रत्येक ॲपल युजरचा ॲपल आयडी पूर्णपणे सुरक्षित आहे. अश्विनी वैष्णव म्हणाले, भारत सरकार सर्व भारतीय नागरिकांची गोपनीयता आणि सुरक्षितता कायम राखण्यास कटीबद्ध आहे. भारत सरकार नागरिकांच्या सुरक्षेबाबत आपली भूमिका खूप गांभीर्याने घेतं. आम्ही याप्रकारच्या संदेशांच्या मूळापर्यंत जाऊन तपास करू. आम्हाला मिळालेली माहिती आणि कथित सायबर हल्ल्याबाबत आम्ही ॲपल कंपनीशी बोललो आहोत. तसेच याप्रकरणी केल्या जाणाऱ्या तपासांत त्यांनाही सामील होण्यास सांगितलं आहे.

### अक्कलकोट येथे संघर्ष योद्धा मनोज

अध्यक्ष दाजी कोळेकर, तालुका उपाध्यक्ष विलास पाटील, सलगर जिल्हा परिषद गट प्रमुख रेवणसिध्द शेरी,रिपाइंचे जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी, तालुका सरचिटणीस राजु भगळे, तालुका कार्याध्यक्ष राजू बोरगांवकर, युवक तालुकाध्यक्ष अप्पा भालेराव, गुरुशांत दोडमनी, विजयकुमार पोतेनवरु, विठोबा कोळेकर, नागनाथ शिरोळे, अंबादास शिंगे, कृष्णा दोडमनी, दस्तगीर मुजावर, तम्मा दसाडे, बंटी मडिखांबे, दत्ता कांबळे, सनी सोनटक्के, वासू कडबगावकर, शुभम मडिखांबे, सत्तारभाई शेख बासलेगावले, मैनुद्दिन कोरबू, भिमा मलवे, अंकुश चौगुले, सिध्दाराम माळी, प्रितिश किलजे, मोतिराम राठोड, नागनाथ कुंभार, पिंटू दोडमणी, चंद्रकांत गायकवाड, केदार माळशेट्टी, निखिल पाटील, अभिजीत लोकापुरे, आदीजणांनी उपस्थित राहून पाठिंबा दिले.

या प्रसंगी बोलताना रासपचे सुनिल बंडगर, आरपीआय आठवले गटाचे अविनाश मडिखांबे, शहर अध्यक्ष अजय मुकणार, लहूजी शक्ती सेनेचे वसंतराव देडे यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत इतिहासाचे विवेचन करून मराठा समाजाला आरक्षण मिळोतोपर्यंत आमचा पाठिंबा असल्याचे उभयत्यांनी सांगितले. तर शिवा संघटनेचे प्रा. परमेश्र्वर आरबाळे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या मराठा आरक्षण भुमिकेबाबत कडत शब्दात तोफ डागली. केंद्र सरकार ज्या प्रमाणे एखाद्या विषयी विशेष अधिवेशन बोलवते, तसेच अधिवेशन केंद्राने बोलवावे, अन्यथा मराठा समाज 'देता का जाता' हे सुनावेल. याचा परिणाम आगामी निवडणूकीत निश्र्चित होणार असे प्रा. आरबाळे म्हणाले. या बरोबरच पुढे बोलताना महेश इंगळे म्हणाले की, सरसकट मराठा समाजाला आरक्षण मिळणे गरजेचे आहे. मनोज जरांगे–पाटील हे नरवीर तानाजी मालुसरे यांच्या भूमिकेत आहेत. मराठा समाजातील युवक आता रस्त्यावर उतरला आहे. आता माघार नाही, आता समाज स्वस्थ बसणार नाही. ॲड. शरद फुटाणे म्हणाले की, या निमित्त्याने मराठा समाजातील ऐक्य पहायला मिळत आहे. मात्र आरक्षणाचा मुद्दा कळीचा असून या करिता राज्य सरकारकडून आरक्षण मिळण्याकामी त्वरीत कारवाई करावी अशी मागणी ॲड. फुटाणे यांनी केली. जेष्ठ नेते शिवाजीराव पाटील यांनी देखील राज्य व केंद्र सरकारकडून मराठा समाजाला आरक्षण देण्याकामी योग्य ती उपाययोजना करणे, व जरांगे –पाटील यांचे उपोषण गांभीर्याने घेणे आवश्यक आहे असे सांगितले. तम्मा शेळके, बाळासाहेब मोरे, सुभाष गडसिंग यांनी देखील आरक्षणाच्या बाबतीत राज्य सरकारकडून होत असलेल्या चालढकली मुळे आज हे मराठा समाजात वातावरण निर्माण झाले आहे. मनोज जरांगे–पाटील यांची तब्बेत खालावत चालली असून त्याबाबत सरकारकडून बघ्याची भूमिका घेऊ नये सरकट मराठा समाजाला आरक्षण द्यावे, काहीजण मराठा आणि ओबीसी यांचा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे आरोप केले.उपविभागीय अधिकारी विठठलराव उदमले यांनी उपोषणा सथली भेट दिले.

याप्रसंगी तहसिलदार बाळासाहेब शिरसाट यांना सकल मराठा समाजाच्या वतीने समाजाला त्वरीत आरक्षण मिळण्याकामी निवेदन सादर करण्यात आले. यावेळी बाळासाहेब शिरसाट यांनी सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आलेले निवेदन त्वरीत राज्य शासनाला कळवू असे सांगितले. त्यांच्या समवेत उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र हे उपस्थित होते.

यावेळी प्रदिप जगताप, मनोज निकम, प्रविण देशमुख, कुमार सुरवसे, बाबासाहेब पाटील, वैभव नवले, प्रथमेश इंगळे, शितल जाधव, संजय गोंडाळ, प्रविण घाटगे, योगेश पवार, वैभव मोरे, प्रथमेश पवार, स्वामीराव मोरे, संतोष भोसले, पिटू साठे, आकाश शिंदे, सागर गोंडाळ आतिश पवार, मनोज गंगणे, गोटू माने, टिनू पाटील, बालाजी पाटील, प्रविण बाबर, निखिल पाटील, राजेंद्र पवार, रणजित जाधव, ज्ञानेश्र्वर भोसले, श्रीशैल कुंभार, समर्थ घाटगे, महेश दणके, राम जाधव, रवि कदम, अंकुश पवार, आकाश गडकरी, सुनिल पवार, गोविंदराव शिंदे, रोहन शिर्के, भरत राजेगावकर, अंकुश पवार, पप्पू गडदे, राजू माकणे, पवन पाटील, किरण जाधव, अभय जगताप, ज्योतीबा चव्हाण, स्वामीनाथ बेंद्रे, पिंटू मचाले, ओंमकार महाडिक, ज्ञानेश्र्वर पुजारी, किरण साठे, सुरेश कदम, नितीन शिंदे, अमित थोरात, नितीन शिंदे, गोरखनाथ माळी, बालाजी कठारे, कल्याणराव देशमुख, सागर गोंडाळ, गिरीष पवार, राहूल इंडे, प्रकाश लोंढे, गणेश लांडगे यांच्यासह शहर व तालुक्यातील बहुसंख्येने मराठा समाज बांधव उपस्थित होता. बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन प्रा.प्रकाश सुरवसे यांनी केले.

### मराठा समाजाला आरक्षण

मनोज जरंगे पाटील यांनी गेल्या अनेक वर्षापासून लढत असलेले मराठा समाजाच्या आरक्षणासाठी चालू असलेल्या आंदोलनास आपण कुठल्याही प्रकारचे गालबोट न लावता शांततेत उपोषण करणे गरजेचे आहे कायदा सुव्यवस्था न बिघडता आपण आपल्या पद्धतीने शांततेत मोर्चा काढून आपले मागणी शासन दरबारी मांडण्यासाठी प्रयत्न करूया आमच्या गोगांव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने मराठा आरक्षण साठी जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे शिवसेना ( उबाठा ) विभागप्रमुख मुगेद्र मुदिनकेरी यांनी ही मनोगत व्यक्त करून पाठींबा जाहीर केले, संघर्ष सामाजिक संस्थेचे वतीने मराठा आरक्षणास पाठिंबा असल्याचे जाहीर करण्यात आले, मराठा आरक्षण मिळण्यासाठी एक दिवशी लाक्षणिक उपोषण शिव बसव चौक वागदरी येथे शांततेत करण्यात आले यावेळी वागदरीचे गाव कामगार तलाठी कोळी यांना निवेदन देऊन वागदरी बाजारपेठ दोन तास बंद ठेवून शांततेत आंदोलन करण्यात आले,

सकल मराठा समाज वागदरी व सर्व राजकीय पक्षी व विविध सामाजिक संघटनेच्या वतीनेवतीने एक दिवशीय उपोषण करण्यात आला यावेळी सर्व गावातील समाज बांधव, सर्व राजकीय पक्ष तसेच सर्व व्यापारी आपले दुकाने बंद करून मराठा समाजाला पाठिंबा देऊन सहकार्य केले

## नागणसूर येथील'श्रीं'चे तैलचित्राचे व ग्रंथांचे मिरवणूक संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यातील नागणसूर येथील श्री गुरु बसवलिंगेश्र्वर महास्वामीजींचे ९१ वे पुण्यस्मरणोत्सवानिमित्त 'श्रीं'चे तैलचित्राचे व ग्रंथांचे काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत श्री.म.नि.प्र. डॉ.अभिनव बसवलिंगेश्र्वर महास्वामीजींचे पूजा अर्चा, महामंगल करून उत्सव संपन्न झाला.या मिरवणुकी दरम्यान नवस मागून घेतलेल्या भक्ताने श्रीच्या तैलचित्रास पैशांच्या नोटांचे हार घालून नवस फेडले. तर काही भाविकांनी वेगवेगळ्या पद्धतीने मिरवणुकीस आलेल्या सर्व भाविकांची सेवा केले. त्यात निलप्पा प्रचंडे, शरणप्पा प्रचंडे बंधूनी दोन ट्रॅक्टर ऊस आणून रात्रभर सर्वांना मोफत ऊसाचे रस वाटप करुन सेवा रुजविले.

मोरे बंधूनी ३०० लिटर दूधखीर, जोड हनुमान गल्लीतील युवकाने ४०० लिटर दूधखीरचे वाटप केले. श्री मल्लिकार्जुन गल्लीतील तरुण मंडळांनी अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. प्रत्येक गल्लीतील तरुण मंडळांनी चहा–बिस्किटची सोय केले. नागणसूर येथील नूतन पोलिस म्हणून नियुक्त झालेले युवकांनी भक्तांना चहाचे व्यवस्था केली. या मिरवणुकीसमोर 'शिव की काशी, अयोध्या का राम, संपूर्ण मथुरा, श्रीकृष्ण का धाम, गंगा आरती देखावा सादर केले तर प्रचंडे प्रशालेतील विद्यार्थिनींनी नृत्य व बाहूल्यांचा अनोखा देखावा सादर केला. वेगवेगळ्या तरुण मंडळांनी लेझीम, टिपर्या, नृत्य सादर केले. श्री गुरु बसवलिंगेश्र्वर महास्वामीजींच्या तौलचित्राचे मिरवणूक बैलगाडीमधून सूर्यकांत गंगोंडा, काशिनाथ भासगी व लक्ष्मण सालूटगी यांच्या बैलजोडीने गाडी ओढून सेवा केली. सदर मिरवणूक यशस्वी होण्यासाठी भक्त व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. तब्बल २३ तासाने श्री मठात मिरवणूकीची जय बसवा, जय जय बसवाच्या जयघोषात सांगता करण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सिताराम सहकारी साखर कारखाना पहिला हप्ता २५०० रुपये प्रति टन देणार

## डॉ.राजलक्ष्मी काळुंगे-गायकवाड यांची मोठी घोषणा



पंढरपूर/प्रतिनिधीः यावर्षी सिताराम सहकारी साखर कारखान्याकडे येणाऱ्या उसाला २५०० रुपये प्रति मॅट्रिक टन पहिली उचल देणार आहे अगोदरच जाहीर केल्याप्रमाणे गाळपास आलेल्या उसाचे बिल मस्टर अनुसार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे सिताराम सहकारी साखर कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ राजलक्ष्मी काळुंगे यांनी सांगितले आहे.

काल सिताराम सहकारी साखर कारखान्याचा ह.भ.प.जयवंत बोधले महाराज यांच्या शुभहस्ते व धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा शिवाजीराव काळुंखे तसेच चेअरमन शोभा काळुंगे यांच्या उपस्थितीत मुळे पूजन व तेरावा गळेप हंगाम शुभारंभ करण्यात आला यावेळी डॉ राजलक्ष्मी काळुंगे बोलत होत्या २०२३२४ गाळभांगामासाठी मशनरी चे आधुनिकीकरण केल्याने दररोज साधारणपणे तीन हजार पाचशे मीटर उसाचे गाळप होणार आहे कारखान्यात आधुनिक दिसणारी प्रकल्प उभा करण्यात आले हे काम हाती घेतले आहे

तो लवकरच पूर्ण होणार आहे त्याचबरोबर ग्रीन हायड्रोजन इंधन निर्मितीचा प्रकल्प उभा करण्यात येणार असून हा प्रकल्प उभा करण्यासाठी भारतातला पहिला कारखाना राहणार आहे मागील गाळप हंगामात कारखान्यास गाळा पास आलेले उषा २३०० रुपये प्रति मॅट्रिक टन दर दिला असून आणखी दिवाळी सणासाठी शंभर रुपये प्रति टन हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खाते जमा करण्यात येणार असल्याचे तसेच मापक दरात उत्पादकांना साखर वाटप करण्यात येणार आहे शासन निर्णयानुसार सिताराम कडील वजन काटे डिजिटल असून शेतकऱ्यांनी आपला ऊस कोठेही वजन करून घेऊन यावा त्यामध्ये कोणतेही तपावत पाहण्यास मिळणार नाही कारखानदारी दराच्या बरोबरीने चोक वजन काट्याची देखील स्पर्धा व्हायला हवी असेल त्यांनी यावेळी सांगितले

प्रा शिवाजीराव काळुंखे म्हणाले की अनेक अडचणीतून हा कारखाना बाहेर काढला आहे या हंगामासाठी मशनरी चे आधुनिकीकरण केल्याने दररोज साधारणपणे तीन हजार पाचशे मीटर उसाचे गाळप होणार आहे

या हंगामात चार लाख मेट्रिक टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट आहे शेतकरी वर्गाचे जगणे सुसाई करण्यासाठी धनश्री व सिताराम परिवार झटत आहे

शेतकरी कामगार ऊस तोडणी वाहतूक कंटाळदार व हितचिंतक यांच्या एकत्रित कामांमधून येणारा सीजन हा नक्की यशस्वी होईल असा उत्पादन शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य फळ त्यांना मिळणार आहे तरी सर्व भागातील ऊस पुरवठा शेतकऱ्यांनी त्यांच्या जास्तीत जास्त ऊस चालू वर्षी सिताराम कारखाना गाळपस देऊन सहकार्य करावे असे त्यांनी आवाहन केले

याप्रसंगी ह भ प अँड जयवंत बोधले महाराज दामाजी शुगरचे चेअरमन शिवानंद पाटील महादेव देठे, डॉ रमेश सिद्धेश्र्वर जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले

यावेळी यादव माळी संचालक सुरज गायकवाड स्नेहल मुद्गुल दिपाली पाटील प्रकाश काळुंखे डॉ रविराज गायकवाड प्रगतशील बागायतदार शिवाजी घोडके दत्तात्रेय सूर्यवंशी सीमाताई काळुंगे विठ्ठल चे माजी संचालक उत्तम नाईक नवरे बिबीशन ताड अविनाश चव्हाण कारखान्याचे कायदे सल्लागार संजय चौगुले धनश्री महिला पतसंस्थेच्या सर व्यवस्थापिका सुनीता सावंत धनश्री मल्टीस्टेटचे जनरल मॅनेजर रमेश फडतरे एस बी रोंगे प्रशासनाधिकारी डी एस सुतार केमिस्ट्री नागणे मुख्य शेती अधिकारी विजय शिंदे को जनरल मॅनेजर वायदंडे परचेस वर्सेस मॅनेजर परचेस ऑफिसर आरएस चळेकर डीजे नागणे इडीपी मॅनेजर टीव्ही भोसले यांच्यासह कारखान्यातील सर्व कर्मचारी ऊस पुरवठा सभासद शेतकरी तोडणे वाहतूक करतात उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जनरल मॅनेजर हनुमान पाटील यांनी केले

# 'ट्रेड एक्स्पो २०२३' मधून विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यांचा विकास : खा.डॉ.जयसिद्धेश्वर स्वामी




पंढरपूर/प्रतिनिधीः 'स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या एमबीए या विभागाने आयोजित केलेल्या 'ट्रेड एक्स्पो २०२३' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यांच्या विकासास चालना मिळते. या मेळाव्याच्या माध्यमातून स्वेरीने विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे त्यामुळे एमबीए मधील विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच बाहेरील विश्र्वातील आवश्यक असणारे ज्ञान या उपक्रमामुळे मिळते. बाहेरील जगामध्ये वस्तूंची खरेदी-विक्री कशी केली जाते, याबाबतचे व्यवहार ज्ञान या 'ट्रेड एक्स्पो'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे मिळते.' असे प्रतिपादन सोलापूरचे खासदार डॉ. जयसिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामी यांनी केले. गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या एम.बी.ए. विभागातर्फे विद्यार्थ्यांना अभ्यासाचाच एक भाग म्हणून वेगवेगळ्या विषयावरील प्रात्यक्षिकाकरिता 'ट्रेड एक्स्पो २०२३' या कृषी व ग्राहक मेळाव्याचे आयोजन केले होते. ऐन युवा महोत्सवात या उपक्रमाचे आयोजन केल्यामुळे याला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. 'ट्रेड एक्स्पो २०२३'चे उदघाटन सोलापूरचे खासदार डॉ. जयसिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाविषयी मार्गदर्शन करत होते. यावेळी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे नूतन कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी एमबीए विभागप्रमुख प्रा.करण पाटील यांनी 'ट्रेड एक्स्पो २०२३' या उपक्रमाची तसेच सहभागी कंपन्या, खरेदी-विक्री, प्रदर्शन याविषयी माहिती दिली. यावेळी कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले की, 'युवा महोत्सवात अधिक करून युवक वर्गाचा सहभाग असतो. त्यांनी आपली कला सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांना कॅम्पसमधील 'ट्रेड एक्स्पो २०२३' सारख्या आकर्षक आणि विधायक उपक्रमाला भेट देण्याचा मोह नक्कीच आवरता येणार नाही. अशा उपक्रमांची



पाहणी केल्यास त्यांना पुढील कला सादर करण्यासाठी अधिक उर्जा मिळते आणि जनरल नॉलेज मध्ये देखील भर पडते. त्यामुळे स्वेरीच्या एमबीए विभागाच्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे युवकांकडून निश्र्चितच भव्य स्वागत होईल.' ऐन 'युवा महोत्सवा'त केलेल्या या आयोजनामुळे चारही दिवस 'ट्रेड एक्स्पो २०२३' ला अक्षरशः जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. एमबीए अभ्यासक्रमासाठी अत्यावश्यक असलेल्या या 'ट्रेड एक्स्पो २०२३' च्या उत्साहवर्धक मेळाव्यातून सहभागी कंपन्याची लाखो रुपयांपर्यंतची उलाढाल झाली. या सहभागी कंपन्यांमध्ये कृषी, विमा, खते, बी-बियाणे, कपडे, ज्वेलरी, मोबाईल व साहित्य, गृहोपयोगी साहित्य, खाद्यपदार्थ, मिठाई पासून ते टू व्हिलर, ट्रॅक्टरसह फोर व्हिलर पर्यंतची वाहने विक्री व प्रदर्शनासाठी उपलब्ध करण्यात आली होती. यावेळी लहान - मोठया वाहनांच्या खरेदीसाठी बुकिंग करण्यात आले. 'ट्रेड एक्स्पो २०२३' या मेळाव्यात लहान मोठ्या मिळून जवळपास पन्नास विविध कंपन्यांचे सदस्य आपल्या उत्पादनांचे महत्व पटवून देत होते. या 'ट्रेड एक्स्पो २०२३' या मेळाव्याला चार दिवसात जवळपास २५ हजार ग्राहकांनी भेटी दिल्या. हा मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली विभागप्रमुख प्रा.करण पाटील यांच्या नेतृत्वाखाली एमबीए विभागातील प्राध्यापक, शिक्षेकतर कर्मचारी यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमातून बाहेरील जगात संवाद कसा साधायचा आणि व्यवहार कसे करावेत याचे शिक्षण एमबीए च्या विद्यार्थ्यांना मिळाले. प्रत्येक दिवशी ग्राहकांची संख्या वाढत गेल्यामुळे अखेरच्या दिवशी वस्तू उत्पादन कंपन्यांनी व ग्राहकांनी आणखी दोन दिवस वाढवून मिळण्याचा आग्रह धरला परंतु एमबीए अभ्यासक्रमाच्या दृष्टीने आणखी दिवस वाढविणे अशक्य असल्याचे संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सांगितले. 'ट्रेड एक्स्पो २०२३' या उपक्रमाने अधिक गर्दी खेचून 'युवा महोत्सवा'त वेगळे चैतन्य निर्माण केले.

# सैनिक टाकळीचा सार्थकराज सागर पाटील ने सर्व भारतामध्ये १०६ रँकने पार केली युपीएससी एन.डी.ए.ची परीक्षा

सैनिक टाकळी/संजय चव्हाणः शिरोळ तालुका सैनिक टाकळीचा सुपुत्र कु.सार्थकराज सागर पाटील ने सर्व भारतामध्ये १०६ रँकने पार केली युपीएससी एनडीएची परीक्षा. सार्थकचे ५ वी पासून शिक्षण कागल तालुक्यातील आय पी एस स्कूल, बोरवडे, ता. कागल मध्ये चालू झाले. तेथूनच त्याची राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून कॉलेज साठी निवड झाली. अशा प्रकारची देशामध्ये पाच कॉलेज आहेत. या कॉलेजची विशेषता ही आहे की देशाच्या संरक्षण खात्यामध्ये जाऊ जाऊ इच्छिणाऱ्या मुलांना ही एक सुवर्ण संधी असते. या कॉलेजमध्ये आठवीपासून बारावीपर्यंत ऑफिसर साठी जे जे शिक्षण हवे असते ते सर्व प्राप्त होते. या कॉलेजमध्ये सर्व गुण संपन्न विद्यार्थी सिलेक्ट होतो कारण वर्षातून या कॉलेज साठी देशातून पन्नास विद्यार्थ्यांची निवड होते म्हणजेच प्रत्येक राज्यातून वर्षाला प्रत्येक दोन विद्यार्थी यावरूनच तुम्हाला समजेल असेल की कशा प्रकारची ही पात्रता असते. सार्थकने आपल्या पाच वर्षाच्या या कॉलेजमधील



कालावधी मध्ये प्रत्येक क्षेत्रात नाव कमविले आहे. या कालावधीत त्यांनी बौद्धिक व शारीरिक ऍक्टिव्हिटी मध्ये अनेक प्रशंसा पत्र प्राप्त केले आहेत. जरवर्षी एनडीए परीक्षेसाठी लाखो विद्यार्थी बसत असतात. यावर्षी पण जवळजवळ सहा लाख विद्यार्थी लेखी परीक्षेसाठी बसले होते आणि त्यातून आठ हजार विद्यार्थी पात्र झाले त्यामध्ये आपला सार्थक पण होता. त्यानंतर एनडीए साठी खरा टप्पा असतो तो म्हणजे एस. एस. बी. मुलाखत. एस एस बी बोर्ड म्हणजे सशस्त्र दलाच्या संस्थानासाठी प्रशिक्षणार्थींची निवड करणे. हा सर्वात महत्त्वाचा टप्पा हे मंडळ उमेदवाराची बौद्धिक क्षमता, शारीरिक क्षमता आणि समोरासमोर मुलाकात याची परीक्षा घेते आणि त्याच मूल्यमापनावरतीच योग्य उमेदवाराची निवड करते. या मुलाखतीसाठी आठ हजार विद्यार्थी पात्र झाले होते त्यातूनच ५०० विद्यार्थ्यांना निवडण्यात आले यावरून तुमच्या लक्षात आले असेल की ही प्रक्रिया किती कठीण आहे यामध्ये सुद्धा सार्थक मेरिटमध्ये उत्तीर्ण झाला. या पाचशे विद्यार्थ्यांची निवड झाल्यानंतर त्यांना मेडिकल प्रक्रियेतून जावे लागते ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर यातील योग्य असे ४०० विद्यार्थी निवडण्यात आले त्यामध्ये आपला सार्थक हा पूर्ण देशाच्या यादीमध्ये १०६ वा नंबर आला. हे रँकिंग त्याच्यासाठी खूप काही सांगून जाते कारण त्याच्या घराला कोणताही सैनिक वारसा नसताना आणि आई-वडील शेतकरी कुटुंबातील असतानाही हे शक्य झाले.

आता यानंतरचे त्याचे मिलटरी शिक्षण एनडीए खडकवासला, पुणे येथे तीन वर्षासाठी असणार आहे त्यामध्ये त्याचे मिलिटरी ट्रेनिंग व ग्रॅज्युएशन पूर्ण झाल्यानंतर त्याला त्याच्या मेरिटनुसार तिन्ही दलामधील एक दल निवडता येईल व निवडलेल्या दलासाठी जे पण टेक्निकल ट्रेनिंग असेल ते एक वर्ष असते व त्या ट्रेनिंगसाठी आय एम ए, डेहराडून येते निवड होते व तिथूनच तो सैन्यामध्ये लेफ्टनंट पदी रुजू होईल. या यशाचे सर्व काही यश त्याचे गुरुजन वर्ग,आई वडील, त्याला कायम साथ देणारे त्याचे चुलते सुधीर पाटील व आता सध्या मेडिकलचे शिक्षण घेत असलेला त्याचा मोठा भाऊ सक्षम पाटील.

# बापगाव साईराम रेसिडेन्सीत वर्षावास सांगता समारोप उत्साहात

भिवंडी/मिलिंद जाधव : बुद्धकारा बहु. संस्थेच्या वतीने भिवंडी तालुक्यातील बापगाव साईराम रेसिडेन्सी येथे वर्षावास घरो घरी कार्यक्रम राबविण्यात आला होता. या अंतर्गत या कार्यक्रमाची सुरूवात बौद्धाचार्य ड. विश्र्वनाथ बाबुराव तायडे यांचे राहते घरी बुद्ध आणि त्यांचा धम्म डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित धम्म ग्रंथाचे वाचन ३ जुलै २०२३ ते २८ क्टोबर २०२३ पर्यंत रोज रात्री ८.३०० ते ९.३० आपल्या परिसरातील बौध्द उपासकांना आमंत्रित करुन घेण्यात आली. रोजच हा कार्यक्रम राहते घरी सुरू होता. वर्षावास निमीत्ताने दि.२८ ऑक्टोबर रोजी सकाळी एक तासाची ध्यान साधना घेण्यात आली . सकाळी ९ वाजता परित्राण पाठ



घेऊन.भंते दिपंकर यांनी धम्मदेसना दीली. यावेळी वर्षावासाचे महत्व भंते दिपंकर यांनी उपस्थितांना समजून सागितले. ड.विश्र्वनाथ तायडे यांचे राहते घरी भंते दिपंकर यांचे हस्ते बुद्ध मुर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली.वर्षावासा निमित्ताने चीवरदान कार्यक्रम झाला .यावेळी पत्रकार मिलिंद जाधव, ड.महेंद्र गायकवाड,ड.सिध्दार्थ खुरंगळे, ड.निलेश झाल्टे, ड.गौरव गायकवाड,.सुनिल जमधाडे, सिद्धार्ध मेश्राम ,मनीषा मेश्राम,प्रवीण पडवळ,प्रताप बोदडे ,अविनाश खेमाडे,रत्नशील वाघमारे,सुरेश पाटील, श्रीराम दराडे, श्रीकांत खंकाल,सहदेव खेमाडे , सचिन खेमाडे, राजेश मोरे , गुलाब पारधी , विश्र्वनाथ पाटील , तोंडफोडे, बापगावचे पोलिस पाटील ,नरेश गायकवाड, विशाल सोष्टे, बुद्धकारा बहु. संस्थेचे अध्यक्ष ड.विश्र्वनाथ तायडे, जनाबाई तायडे, संगिता तायडे, योजना तायडे,.डी .डी भालेराव,प्रभावती भालेराव, निखिल कांबळे, स्नेहल कांबळे, तुषार गायधने, निकिता गायधने व साईराम रेसिडेन्सी व बापगाव, पडघा परिसरातील बांधव यांचा सहभाग होता सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.महेंद्र गायकवाड यांनी केले.

# पंढरपूर सातारा रस्त्यावर दहा किलोमीटर पर्यंत लागल्या वाहनांच्या रांगा उपरी येथे रस्ता रोको तरुण व ग्रामस्थ महिलांचाही मोठ्या प्रमाणात समावेश



पंढरपूर/प्रतिनिधीः आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यातील सकल मराठा समाज आक्रमक झाला असून मोठ्या प्रमाणात उग्र आंदोलन केले जात आहे काही ठिकाणी आंदोलनाला हिंसक वळण लागले आहे परंतु उपरी तालुका पंढरपूर येथील सकल मराठा समाजाच्या वतीने ग्रामस्थांनी अहिंसा व लोकशाहीच्या मार्गाने रस्ता रोको करून सरकारला आरक्षणाबाबत निर्वानिचा इशारा देत ग्रामस्थांनी एकत्र येत मतदानावर बहिष्कार टाकण्याची सामुदायिक शपथ घेतली आहे राज्यामध्ये मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीचा मोठा वनवा पेटला आहे उपोषण करते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी व मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी उपरे येथील सकल मराठा समाजाच्या वतीने पंढरपूर सातारा रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये रस्ता रोको करण्यात आले

या आंदोलन दरम्यान मोठ्या प्रमाणात नागरिक महिला व तरुण मोठ्या संख्येने आंदोलन उतरल्यामुळे मोठ्या प्रमाणात चक्काजाम झाला होता पंढरपूर सातारा रस्त्यावर दहा किलोमीटर लांबपर्यंत वाहनाच्या रांगा लागल्याचे पहावयास मिळत होते

या आंदोलनाला मुस्लिम समाज बांधव आरपीआय आठवले गट प्रकाश आंबेडकर गट कोळी महासंघ अण्णाभाऊ साठे युवक संघटना यांच्यासह गावातील सर्वच सामाजिक व राजकीय संघटनाचे आपला पाठिंबा दिला या आंदोलनात एक वर्षाच्या लहान मुलापासून ते ९० वर्षाच्या आजीबाईपर्यंत मोठ्या संख्येने तरुण महिला उपस्थित होते महिलांनी आंदोलनामध्ये मोठा सहभाग घेतला असल्याचे पहावयास मिळाले. मुस्लिम तरुणांनी आले सर्वांच्या डोळ्यात पाणी अहो जरांगे पाटील तुम्ही निदान पाणी तरी प्या संपूर्ण राज्य आज तुमच्या सोबत आहे मराठा समाज हा आमचा मोठा भाऊ आहे

या माझ्या भावाला आरक्षण मिळालेच पाहिजे असे सांगत गावातील मुस्लिम तरुण राजू भाई मुलांनी याने टाहो थोडेच राज्य सरकारच्या भावनिक सात घातल्यानंतर उपस्थित आमच्या डोळ्यात पाणी आल्याचे याप्रसंगी पाहावयास मिळाले त्यामुळे काही काळ वातावरण चांगलेच बाहू झाल्याचे दिसत होते एक मराठा लाख मराठा आरक्षण आमच्या हक्काचे या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून घेण्याचे पाहावयास मिळाले या आंदोलनाला दरम्यान कोणत्याही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पंढरपूर ग्रामीण पोलिसांच्या वतीने चोक बंदोबस्त देण्यात आला होता. सुमारे एक ते दीड तास झालेल्या या आंदोलनामुळे पंढरपूर सातारा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चक्काजाम झाल्याचे पहावयास मिळाले आंदोलनानंतर उपस्थित महिलांनी बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांना निवेदन दिले व आंदोलनाच्या दरम्यान ग्रामस्थांनी सामुदायिक शपथ घेत मतदानावर आपला बहिष्कार टाकला तसेच आजपर्यंत मराठा आरक्षणासाठी यांनी ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या सर्वांना याप्रसंगी श्रद्धांजली वाहण्यात आली